# Cultural & Sports - ACTIVITIES

| | | |
|---|---|---|
| १ | **प्राथमिक नाट्य महोत्सव** | कामगार कल्याण केंद्राकडून प्राप्त होणाऱ्या नाट्य प्रवेशिकेमध्ये **५० टक्के कामगार** कलावंत असलेली प्रवेशिका स्वीकारण्यात येते. विभागस्तरावर संपुर्ण राज्यात १५० पेक्षा अधिक नाट्यसंघ सहभागी होतात त्यामध्ये २७०० कलावंतांचा सहभाग असतो. नाट्यसंघास जाण्या येण्याचा प्रवासखर्च , दैनिक भत्ता , नाटकासाठी लागणारी सामुग्री मंडळाकडून पुरवली जाते. |
| २ | **अंतिम नाट्य महोत्सव** | विभागस्तरावर संपन्न झालेल्या नाट्यमहोत्सावाच्या प्राथमिक फेरीतुन प्रथम क्रमांकाने निवडलेल्या नाटकास राज्यस्तरीय संधी **अंतिम नाट्य महोत्सवातून** उपलब्ध करुन दिली जाते. नाट्यसंघास जाण्या येण्याचा प्रवासखर्च , दैनिक भत्ता , नाटकासाठी लागणारी सामुग्री मंडळाकडून पुरवली जाते. |
| ३ | **औद्योगिक व व्यवसायिक कामगारांसाठी नाट्य महोत्सव** | **औद्योगिक व व्यवसायिक कामगारांसाठी मंडळाने स्वतंत्र नाट्य स्पर्धा घेण्याचे निर्णय घेतला आहे . यामध्ये** १०० टक्के कामगार असलेली प्रवेशिका कंपनीकडूनच स्वीकारण्यात येते.त्यासाठी कंपनीकडून रु.५०००/- अनामत रक्कम घेऊन प्रवेश देण्यात येतो यामध्ये नाट्यसंघास जाण्या येण्याचा प्रवासखर्च , दैनिक भत्ता , नाटकासाठी लागणारी सामुग्री मंडळाकडून पुरवली जाते. मागिल चार वर्षात ६० पैक्षा अधिक कंपनीने सहभाग नोंदवला आहे. |
| ४ | **कामगार साहित्य संमेलन** | मंडळाकडून कामगार लेखक / कवी / साहित्यिक आणि नवोदित साहित्यिक आणि सर्वसाधारण कामगार वर्ग यांच्यासाठी कामगार साहित्य संमेलनाचे आयोजन करण्यात येते.त्यांना हव्काचे व्यासपीठ उपलब्ध करुन देण्यात येते. साहित्य संमेलना सहभागी होणाऱ्या कामगार साहित्यिकांना अल्प नोदणी शुल्क अकारुन मंडळाच्या स्वखर्चाने भोजनाची व निवासाची व्यवस्था केली जाते. आज पर्यंत १५ साहित्य संमेलन यशस्वी झाले आहे. |
| ५ | **राज्य स्तरीय कब्बडी स्पर्धा** | औद्योगिक व व्यवसायिक कामगारांसाठी स्वतंत्र राज्य स्तरीय कब्बडी स्पर्धा मंडळाकडून घेतली जाते.यामध्ये १०० टक्के कामगार खेळाडू असलेली प्रवेशिका कंपनी कडून शिफारस |

| | | |
|---|---|---|
| | | केली जाते. मंडळाच्या खर्चाने त्यांना जाण्या येण्याचा प्रवास खर्च दैनिक भत्ा व विजेत्या संघाना बक्षिसे दिली जातात. |
| ६ | **राज्य कामगार केसरी / कुमार केसरी कुस्ती स्पर्धा** | औद्योगिक व व्यवसायिक कामगारांसाठी स्वतंत्र राज्य स्तरीय कामगार केसरी व बाल गटासाठी कुमार केसरी कुस्ती स्पर्धा मंडळाकडून घेतली जाते. यामध्ये १०० टक्के कामगार खेळाडू असलेली प्रवेशिका कंपनी कडून शिफारस केली जाते. मंडळाच्या खर्चाने त्यांना जाण्या येण्याचा प्रवास खर्च , दैनिक भत्ता व विजेत्या कुस्तीपटुना बक्षिसे दिली जातात. |
| ७ | **राज्य स्तरीय समरगीत स्पर्धा** | ९ ऑगस्ट क्रांती दिना निमित्त राज्य स्तरीय समरगीत स्पर्धेचे आयोजन मंडलाकडून केले जाते .या स्पधेमध्ये प्राथमिक फेरीतून प्रथम क्रमांकाने विजयी झालेल्या संघास प्रवेश दिला जातो. मंडळाच्या खर्चाने त्यांना जाण्या येण्याचा प्रवास खर्च , दैनिक भत्ता व विजेत्या संघाना बक्षिसे दिली जातात. |
| ८ | **राज्यस्तरीय लोकनृत्य स्पर्धा** | महाराष्ट्राची लोककला जोपासण्यासाठी विविध कामगार कल्याण केंद्रमध्ये लोकनृत्याचे आयोजन गट स्तरावर केले जाते .यामध्ये कामगार व इतर केंद्र सभासद इ. सहभाग असतो. प्रथम क्रमांक आलेल्या संघास राज्यस्तरावर प्रवेश दिला जातो. मंडळाच्या स्वखर्चाने सादरीकरण, प्रवासखर्च व दैनिक भत्ता आणि विजेत्या संघास बक्षिसे दिले जाते |
| ९ | **राज्यस्तरीय कामगार भजन स्पर्धा** | २ ऑक्टोबर महात्मा गांधी जयंती निमित्त प्राथमिक स्तरावर भजनस्पर्धेचे आयोजन केला जाते. यामध्ये कामगार पुरूष व महिलांचा सहभाग असतो. दोन स्वतत्र गटात ही स्पर्धा घेण्यात येते प्रथम क्रमांक आलेल्या संघास दिनांक २९ व ३० जानेवारी महात्मा गांधीस्मृतीदिनानिमित्त आयोजित राज्यस्तरीय कामगार भजनी स्पर्धेत प्रवेश दिला जातो. मंडळाच्या स्वखर्चाने सादरीकरण, प्रवासखर्च व दैनिक भत्ता आणि विजेत्या संघास बक्षिसे दिले जाते |